## गोंदिया जिल्हा पोलीस वार्तापत्र

दिनांक :- ९/७/२०१०

**१)पो.स्टे.दवनिवाडा :- वाहन अपघात**

दिनांक ७/७/१० चे १६.३० वा दरम्यान बघोली येथे आरोपी अज्ञात मोटार सायकल चालकाने आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजी पणे चालवुन जख्मी नामे समीर विनायक भोयर वय ५ वर्ष याला धडक मारुन जख्मी केल्याने फिर्यादीचे रिपोर्ट वरुन अज्ञात आरोपी विरुध्द कलम २७९,३३८ भांदवि अन्वये गुन्हा नोंद.

**२)पो.स्टे.आमगाव :- प्राणांतीक वाहन अपघात**

दिनांक ७/७/१० चे २०.३५ वा. दरम्यान तहसिल कार्यालय आमगाव समोर आरोपी काळी - पिवळी जिप क्र एम.एच.-३५/३४९३ चा चालक मृतक नामे झलाद मेहतर राऊत वय २८ वर्ष रा.झालीया याने आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजी पणे चालवुन रस्त्याने जात असलेल्या पादचा-याला धडक मारुन जख्मी करुन समोरुन येणा-या मेटॅडोर क्र.एम.एच-३५/३०३ ला समोरुन धडक मारुन स्वतःचे मरणास व मेटॅडोर मध्ये बसलेल्या इतर ३ इसमांना जख्मी होण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादीचे रिपोर्ट वरुन मृतक आरोपी विरुध्द कलम २७९,३३७,३३८,३०४(अ) भांदवि अन्वये गुन्हा नोंद.

**३) पो.स्टे.आमगाव :- चोरी**

दिनांक २४/४/१० चे रात्र दरम्यान आमगाव येथे फिर्यादी नामे नरसिंह ब्रम्हदिन चौरसिया वय ४२ वर्ष रा.रिसामा यांचे नरसिंह सिनेमा हॉल मधुन टेबल, खुर्ची,इंजिन,मशीन की.३०००/- रु चा माल आरोपी नामे खोपसिंह गोविंदराव कटरे वय ४५ वर्ष रा.जामखारी यांने चोरुन नेल्याने कोर्टाचे आदेशा वरुन आरोपी विरुध्द कलम ३७९ भांदवि अन्वये गुन्हा नोंद.

**४) पो.स्टे.देवरी :- विनयभंग**

दिनांक ८/७/१० चे १४.०० वा. दरम्यान मौजा राजनडोंगरी येथे फिर्यादी स्त्री वय ३५ वर्ष रा.राजनडोंगरी ही शेताकडे जात असता आरोपी नामे कैलाश मारोती कळवणे वय ४० वर्ष रा.राजनडोंगरी यांने फिर्यादीचे मागे जावुन तिचे लज्जेश धोका पोहचेल असे कृत्य तिचे सोबत केल्याने फिर्यादीचे रिपोर्ट वरुन आरोपी विरुध्द कलम ३५४ भांदवि अन्वये गुन्हा नोंद.

**५) पो.स्टे.तिरोडा :- अपघात करुन नुकसान**

दिनांक ८/७/१० चे १७.५० वा. दरम्यान तिरोडा येथील साल्वीन बियर बार समोर आरोपी मेटॅडोर क्र.एम.एच.-३१/डब्ल्यु-३९५२ चे चालक नामे युवराज मुळे वय २१ वर्ष रा. दांडेगाव यांने आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजी पणे चालवुन समोरुन येण्या-या इंडीका व्हिस्टा क्र.एम.एच.-३५/पी.-२२२५ ला समोरन धडक मारुन ४० ते ५० हजाराचे नुकसान केल्याने फिर्यादी नामे देवेंद्र राधश्याम तिवारी वय ३५ वर्ष रा.तिरोडा याचे रिपोर्ट वरुन आरोपी विरुध्द कलम २७९,४२७ भांदवि अन्वये गुन्हा नोंद.

पोलीस अधिक्षक,गोंदिया
करिता